**कामगार आयुक्त, मुंबई यांच्या आस्थापनेवरील सहायक कामगार आयुक्त, गट-अ या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या विनंती बदल्या.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**
**शासन आदेश क्र.बदली-०६२४/प्र.क्र.१०६/कामगार-८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २५ सप्टेंबर, २०२४.

**वाचा:-** "महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५"

**शासन आदेश:-**

"महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५" च्या कलम ४ (४) व कलम ४ (५) मधील तरतूदीनुसार खाली नमूद केलेल्या कामगार आयुक्त, मुंबई यांच्या आस्थापनेवरील सहायक कामगार आयुक्त, गट-अ या संवर्गातील अधिकाऱ्यांची त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या पदावर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्व मान्यतेने विनंती बदली करण्यात येत असून, त्यांना खालीलप्रमाणे पदस्थापना देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सध्याचे कार्यरत ठिकाण | विनंती बदलीनंतरची पदस्थापना | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | श्री. दि. सां. दाभाडे | ठाणे | कामगार उप आयुक्त कार्यालय, पालघर. | रिक्त पदी |
| २ | श्री. प्रविण जाधव | पुणे | पुणे (खेड तालुक्यातील चाकण एमआयडीसी फेज-१ व ३ व इतर संबंधित कार्यक्षेत्र) | श्री.ग.स.शिंदे, स.का.आ. यांच्या विनंती बदलीने रिक्त झालेल्या पदी. |
| ३ | श्री. ग. स. शिंदे | पुणे | पुणे (मावळ तालुका, जुन्नर तालुका व पिंपरी-चिंचवड मनपा अ व ब प्रभागातील कार्यक्षेत्र) | श्री.प्रविण जाधव, स.का.आ. यांच्या विनंती बदलीने रिक्त झालेल्या पदी. |
| ४ | श्रीम. सारिका राऊत | मुंबई | कामगार उप आयुक्त कार्यालय, ठाणे. | श्री.दाभाडे, स.का.आ. यांच्या विनंती बदलीने रिक्त झालेल्या पदी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | श्री.नि.कृ.कवले | अहमदनगर | सहायक कामगार आयुक्त कार्यालय, सातारा. | श्री.भिसले, स.का.आ. यांच्या विनंती बदलीने रिक्त झालेल्या पदी. |
| ६ | श्री.रे.मु. भिसले | सातारा | सहायक कामगार आयुक्त कार्यालय, अहमदनगर. | श्री.कवले, स.का.आ. यांच्या विनंती बदलीने रिक्त झालेल्या पदी. |
| ७ | श्री. राजू गुल्हाने | मुंबई | सहायक कामगार आयुक्त कार्यालय, जळगांव. | रिक्त पदी. |

२. सदर आदेश तात्काळ अंमलात येतील. कामगार आयुक्त, मुंबई यांनी उपरोक्त सहायक कामगार आयुक्त यांना तात्काळ कार्यमुक्त करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करुन, त्यांना त्यांच्या बदलीच्या ठिकाणी हजर होण्याच्या सूचना द्याव्यात व याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

३. वरील विनंतीने बदली झालेल्या अधिकाऱ्यांना पदग्रहण अवधी, प्रवास भत्ता, दैनिक भत्ता व अन्य लाभ अनुज्ञेय होणार नाहीत.

४. बदली अधिनियमानुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने पारीत केलेल्या आदेशाचे पालन न करणे ही बाब गंभीर स्वरूपाची असून यामुळे पालन न करणारा अधिकारी/कर्मचारी, विभागीय चौकशी नियमपुस्तिका १९९१ च्या प्रकरण-२ मधील कलम २.१ (२) (पाच) अन्वये निलंबनाच्या कार्यवाहीस पात्र ठरेल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

५. संबंधित अधिकाऱ्यास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्यांना मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत.

६. सदरहू आदेशानुसार संबंधित अधिकारी यांनी बदलीच्या पदावर हजर न होता लोकप्रतिनिधीमार्फत अथवा अन्य मार्गाने बदली रद्द करण्याबाबत किंवा अन्यत्र बदली करण्याबाबत दबाव आणल्यास, सदर कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३ व २३ चा भंग करणारी असल्याने संबंधित अधिकारी शिस्तभंगविषयक कार्यवाहीस पात्र ठरतील, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२४०९२५१६२४०१३२१० असा आहे. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL
YASHWANTRAO
KAPADNIS

Digitally signed by SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=3389518a88af500ef17fd52858804c56d5b0db93ce68c9638764849614f0c8b3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=824DB7B32ED13AAC7B6F1F11E717770B52D6784F2BC41DDF0E4E9729CDB96F88, cn=SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
Date: 2024.09.25 16:25:34 +05'30'

**( स्वप्निल कापडणीस )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

कामगार आयुक्त, कामगार भवन, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.

**प्रत,**

१. मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
३. कामगार उप आयुक्त (प्रशासन) कामगार भवन, ब्लॉक-ई, सी-२०, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
४. सर्व संबंधित अधिकारी (कामगार आयुक्त यांचेमार्फत)
५. महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुदेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
६. संबंधित सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
७. उप सचिव (कामगार-८) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
८. निवडनस्ती (कामगार-८)